दै. रिपब्लिकन गार्ड दि. 09/09/2022

# शिवाजीनगर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा केला उघड;पाच युवकांना घेतले ताब्यात

नांदेड,(प्रतिनिधी)-शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेला एक जबरी चोरीचा प्रकार शिवाजीनगरच्या गुन्हे शोध पथकाने उघडकीस आणला. पाच युवकांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून १२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सोबतच एका २७ वर्षीय युवकाला पकडून शिवाजीनगर पोलीसांनी त्याच्याकडून धार-धार हत्यार जप्त केले आहे.

शिवाजीनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १ ऑगस्ट २०२२ रोजी अण्णाभाऊ साठे चौक उड्डाण पुलाखाली काही अनोळखी लोकांनी एका व्यक्तीला मारहाण करून त्याच्याकडील एक मोबाईल आणि रोख रकम असा ५ हजार ५०० रुपयांचा लुटला होता. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९०/२०२२ भारतीय दंड संहितेच्या कलम ३९४,३४ नुसार दाखल झाला होता.या गुन्ह्यातील आरोपी शोधतांना शिवाजीनगरच्या गुन्हे शोध पथकाला मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी उदय उर्फ लड्ड्या भगवान हातांगळे (२४) याच्याकडे या बाबत विचारणा केली असता त्याने व इतर साथीदारांनी मिळून हा गुन्हा केला होता ही बाब उघड झाली. त्याचे साथीदार विशाल कैलास खिल्लारे (२१), सुरज रामकिशन घेणे (१९) अक्षय उर्फ भोप्या सुरेश कांबळे (२१) किर्तीपाल भिमराव आढाव (२०) हे होते. शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने त्यांना ताब्यात घेतले आहे.शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने ६ सप्टेंबर रोजी दररोजचे काम करत असतांना त्यांना सुनिल सटवाजी जाधव (२७) रा.राजनगर नांदेड हा आपल्या हातात खंजीर बाळगून फिरतांना सापडला पोलिसांनी त्याच्याविरुध्द भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

शिवाजीनगर पोलिसांनी केलेल्या कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे,विजय कबाडे, पान ४ वर

दै. मराठवाडा दि. 08/09/2022

दैनिक मराठवाडा 08/09/22

# आयजींच्या पथकाची जुगार अड्ड्यावर धाड

## ● ४ लाखांच्या रकमेसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त ●



नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड पोलीस परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर विशेष पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाने दि. ६ सप्टेंबरच्या रात्री छापा टाकून तब्बल २४ जणांना ताब्यात घेतले. ४ लाख रूपयांच्या रकमेसह २० लाख रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी हट्टा पोलीस ठाण्यात २४ जणांविरूद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नांदेड पोलीस परिक्षेत्रांतर्गत सुरू असलेल्या अवैध धंद्यांना लगाम लावण्यासाठी विशेष पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांनी कायद्याचा बडगा उगारला आहे. हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती विशेष पोलीस उपमहानिरीक्षकांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे तुळजापूर वाडी शिवारात दिलीप गणेशराव चव्हाण याच्या आखाड्यावर टिनशेडमध्ये २४ जुगारी जुगार खेळतांना रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई विशेष पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोली यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, सपोनि संकेत दिघे, पोउपनि संदीप जोंधळे, पोउपनि दिनेश येवले, पोलीस अंमलदार रूद्रा कवाडे, साईनाथ सांगवीकर, बाबू सरकलवार, दत्ता पुणेवोईनवाड, सुनिता येळगे, भगवान कोतापल्ले, अनिल सिद्धापूरे, मारोती मुदेमवार, चंद्रमुनी सोनकांबळे यांच्या पथकाने केली आहे. या कारवाईत ४ लाख ११ हजार ५३० रूपये रोख, २ चारचाकी वाहने, १० दुचाकी, २६ मोबाईल असा एकूण २० लाख ३४ हजार ८३० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व जुगारी हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातील असल्याचे सांगण्यात आले.

दै. गोदातीर समाचार दि. ०९/०९/२०२२

# नांदेडमध्ये जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद; शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाची कारवाई

**नांदेड-** शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये दाखल झालेल्या वेगवेगळ्या गुन्ह्यांसंदर्भात आरोपींच्या मुसक्या आवळण्याची मोहीम पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली. ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने अण्णाभाऊ साठे चौक भागातून जबरी चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद केले आहे.

१ ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे चौक जवळ असलेल्या हिंगोली गेट उड्डाण पुलाखाली अनोळखी आरोपीतांनी एका व्यक्तीस कड्याने मारहाण करून त्याचेकडील ओपो कंपनीचा मोबाईल व नगदी साडेपाच हजार रुपयांचा माल जबरीने चोरून नेल्यावरून शिवाजीनगर ठाण्यात कलम ३९४,३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांना व गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे बाफना उडाण पुलाचे रोडवरून आरोपी उदय उर्फ लड्या भगवान हातागळे (वय २४) राहणार यात्री निवास परिसर नांदेड यास ताब्यात घेवुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता, त्याने व इतर साथीदारांनी मिळून गुन्हा केल्याचे सांगितले. त्याचे सहकारी आरोपी विशाल कैलास खिल्लारे (वय २१), सुरज रामकिशन घेणे (वय १९), अक्षय उर्फ भोप्या सुरेश कांबळे (वय २१) किर्तीपाल भीमराव आढाव (वय २०) सर्व राहणार लक्ष्मीनगर, नांदेड यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरलेला एक ओपो कंपनीचा मोबाईल किमत १० हजार व नगदी दोन हजार ३०० रूपये असा १२ हजार ३०० रूपयाचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख व पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर यांचेमार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे यांच्या पथकाने केली.